उत्सव • नाताळ सजावटीच्या वस्तूंनी शहरातील बाजारपेठा सजल्या

# चर्चमध्ये अन् घरोघरी उत्साहात सुरू येशूंच्या जन्माची तयारी

प्रतिनिधी | औरंगाबाद

दसरा-दिवाळी संपताच सुरू झालेल्या हळुवार थंडीत ख्रिस्तीजन तसेच ख्रिस्तेतरांना प्रतीक्षा लागते नाताळाची. नाताळच्या महिनाभर आधीपासूनच ख्रिस्त जन्मोत्सवाचे वेध लागून चर्चेसमध्ये महिनाभर आधीच्या चारही रविवारी नाताळाच्या आगमन कालाचा विधी सुरू होतो.

अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या नाताळाच्या पार्श्वभूमीवर हा सण अध्यात्म, भक्ती व श्रद्धेसोबतच आनंद, हर्ष, उल्हास आणि एकंदर जल्लोष घेऊन येणार असल्यामुळे त्यासाठी आता काऊंट डाऊन सुरू झाले आहे.

चर्च, घरे, गल्ल्या व इमारती सजवण्याचे काम आता वेगाने सुरू असून ठिकठिकाणी नाताळ गोठे बनवण्याच्या कामावर अंतिम हात फिरवला जात आहे. यासाठी लागणाऱ्या वस्तूंनी परिसरातील बाजारपेठा सजल्या असून, सर्वत्र नाताळ तयारीच्या वस्तू खरेदीची लगीनघाई सुरू आहे. घराघरात फराळाच्या पक्वान्नांची, केक बनवण्याची लगबग सुरू आहे.

सांताक्लॉजचे लहान-मोठे आणि देशी-परदेशी बनावटीचे रंगीबेरंगी बाहुले, ख्रिसमस-ट्री, जिंगल बेल, कागदी स्टारसोबतच लाकडी स्टार, विविध स्वरूपातील चॉकलेट बॅगा, नाताळासाठी खास तयार केलेले म्युझिकल लाइट, टेबल क्लॉथ, ग्रीटिंग कार्ड्स, डोअर-मॅट, वेलकम बॅनर, लाइटिंग-ट्री, स्नो इफेक्ट, ख्रिसमस ट्री, सिगिंग अँड डान्सिंग कॅप, रंगीबेरंगी इको-फ्रेंडली कॅंडल्स व स्टार्स अशा शेकडो नाताळाच्या चीजवस्तूंनी बाजारपेठा गजबजल्या आहेत.



### गिफ्टसाठी यांची होतेय निवड

गुलमंडी येथील दुकानात नाताळाच्या सणानिमित्ताने सांताक्लॉजचे रेडिमेड कपडे १५० रुपयांपासून ते ६६० रुपयांपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. याबरोबरच ख्रिसमस ट्री, फुलांनी सजवलेली ख्रिसमिस रिंग, बॉल्स, ड्रम, एवढेच नव्हे, तर इतरांना गिफ्ट देण्यासाठीसुद्धा लहान आकारातील सांता आणि सांताच्या टोप्यासुद्धा उपलब्ध झालेल्या आहेत.



**संताच्या ड्रेसला मागणी**

*गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी खरेदी चांगली होत आहे. सांताच्या रेडिमेड ड्रेस खरेदीला मागणी होत आहे. तसेच विविध गिफ्टसुद्धा लोक खरेदी करताहेत.*

**अमोल बोडखे,** विक्रेता

## सत्यजित खारकर यांना सावित्रीबाई जोशी स्मृती पुरस्कार

**औरंगाबाद** | जीवन विकास ग्रंथालयातर्फे देण्यात येणारा कै. सावित्रीबाई वा.जोशी स्मृती पुरस्काराचे वितरण शुक्रवारी (दि. २८ डिसेंबर) जीवन विकास ग्रंथालयाच्या सभागृहात सायंकाळी ६ वाजता ज्येष्ठ पत्रकार संजय वरकड यांच्या हस्ते होईल. यंदा हा पुरस्कार "करू का गुदगुल्या' या विनोदी कथासंग्रहाचे लेखक सत्यजित खारकर यांना जाहीर झाला आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन माजी न्या. अंबादास जोशी, भास्कर आर्वीकर, नितीन कंधारकर, नितीन काजवे यांनी केले आहे.

## उद्यापासून संस्कार शिबिराचे आयोजन

**औरंगाबाद।** नाताळच्या सुट्यांचे औचित्य साधून गीता परिवाराच्या वतीने २५ डिसेंबर ते २९ डिसेंबरपर्यंत संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महेशनगर राधाकृष्ण मंदिर या ठिकाणी दुपारी ३ ते ५ या वेळेत संस्कार शिबिर घेण्यात येत आहे. या शिबिरात गीतेचा अभ्यास, संस्कृत श्लोक, मनोरंजनात्मक खेळ घेण्यात येणार आहेत.

# श्री, नंद, यमन रागांनी युवा सरगम महोत्सवात भरले रंग

पिनाक संगीत अकादमीच्या युवा सरगम महोत्सवाचा थाटात शुभारंभ

प्रतिनिधी । औरंगाबाद

शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पिनाक संगीत अकादमीतर्फे तीनदिवसीय युवा सरगम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन उस्मानपुरा येथील कलश मंगल कार्यालयाच्या हिरवळीवर शनिवारी (२२ डिसेंबर) झाले.

उद्घाटन मनपा स्थायी समितीचे, सभापती रेणुकादास वैद्य, आणि संगीतप्रेमी नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीरंग देशपांडे, पंडिता शुभदा पराडकर यांच्या हस्ते झाले. या वेळी विनोद शिराळकर, ज्योती शिराळकर, भारती न्यायाधीश यांची उपस्थिती होती. पहिल्या दिवसाची सुरुवात शिवानी कुलकर्णी हिच्या गोड आवाजातील ईशस्तवनाने झाली. तिने "जय शारदे वागेश्वरी...."गाऊन मैफलीचा शुभारंभ केला. तिने संध्याकाळी गायला जाणारा राग "श्री" विलंबित ख्याल "तीलवाडा" तालात आणि छोटा ख्याल "द्रुत तीन" तालात सादर केला. बडा ख्याल सादर करताना तिने "वारी जाऊं रे.... "ही रचना सादर केली. छोटा ख्यालमध्ये "चलो री माई रामसिया दरसन को... " ही रचना सादर केली.

संध्याकाळी व रात्रसमयी गायला जाणारा राग "नंद" पेश करत तिने महोत्सवाच्या पहिल्या सत्राचा शेवट केला. तबल्यावर अद्वैत टाकळकर व हार्मोनियमवर गजानन केचे यांनी साथसंगत केली. सावनीनंतर ओंकार अग्निहोत्रीने हार्मोनियमवरील राग सादरीकरणातील नजाकती व लालित्यपूर्ण हरकतींनी मैफलीत गहिरे रंग भरले. तबल्यावर तेजोवृष जोशी यांनी साथसंगत केली. अंजली व नंदिनी गायकवाड यांनी राग मधुवंती सादर केला. तबल्यावर जगदीश व्यवहारे व संवादिनीवर त्यांचे गुरू व वडील अंगद गायकवाड यांनी साथसंगत केली. सायली मुळे हिने सूत्रसंचालन केले.




### महोत्सवात आज आणि उद्या असे होणार कार्यक्रम

रविवारी पं.अरविंदकुमार आझाद यांची शिष्या सई बाराबोटे सोलो तबलावादन सादर करेल. त्यानंतर पं. राजा काळे यांची शिष्या आणि कन्या अमृता काळे हिच्या शास्त्रीय गायनाचा आस्वाद रसिकांना घेता येईल. झी युवा वाहिनीवरील संगीत सम्राटचा विजेता रवींद्र खोमणे याच्या "सुफियाना " गायनाने दुसऱ्या दिवसाचे सत्र संपेल. सोमवार, दि. २४ डिसेंबर रोजी "संगीतातील बदलते स्वरूप आणि व्यावसायिक दृष्टिकोन" या विषयावर विशेष परिसंवाद ठेवण्यात आला आहे. .

# प्रा.देसरडा अमृतमहोत्सवी गौरवतर्फे आज परिसंवाद

प्रतिनिधी । औरंगाबाद



अर्थतज्ज्ञ प्रा. एच.एम. देसरडा यांच्या अमृतमहोत्सवी गौरव समितीच्या वतीने रविवारी (२३ डिसेंबर) एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात सकाळी ११ वाजता विशेष परिसंवाद व दुष्काळाच्या परिस्थितीवर राज्यव्यापी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.या परिसंवादात 'भारतातील शेती, पर्यावरण व परिवर्तनाच्या चळवळीसमोरील आजची आव्हाने' या विषयावर जागतिक कीर्तीच्या शेती व पर्यावरणतज्ज्ञ डॉ. वंदना शिवा, नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या मेधाताई पाटकर व राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आपली भूमिका मांडणार आहेत. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम असतील. परिसंवादानंतर दुपारी २ ते ५ या वेळेत एजीएमच्या आइन्स्टाइन हॉलमध्ये यंदाच्या दुष्काळाची दाहकता लक्षात घेऊन पाणी व चाराटंचाई, अन्नपुरवठा यावर कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. यात राज्यातील विविध भागांतील ३०० प्रतिनिधी सहभागी होणार असून धोरणात्मक निर्णय घेऊन जनजागृती करण्याच्या दृष्टीने काम हाती घेतले जाणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## छावणी आठवडी बाजारात महिलांसाठी होणार स्वच्छतागृह

**औरंगाबाद** | छावणी परिसरातील गुरुवार आठवडी बाजारात मूलभूत सुविधा नाही. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून छावणी या बाजारात भाजीपाला विक्रेत्या महिला, तसेच महिला ग्राहकांना स्वच्छतागृह नव्हते. अखेर अनेक वर्षांपासून प्रलंबित या स्वच्छतागृहाच्या प्रतीक्षेला शेवटी विराम लागणार आहे. केंद्राच्या वतीने प्राप्त या नवीन निधीतून आठवडी बाजारात महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात येणार आहे. त्यासाठी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पार पडणाऱ्या बैठकीत याविषयी चर्चा करून निविदा काढण्यासंबंधी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती छावणी परिषदेच्या उपाध्यक्षा पद्मश्री अनिल जैस्वाल यांनी दिली.

# आझादच्या विद्यार्थ्यांचे दिनियात स्पर्धेत यश



**औरंगाबाद** | मुंबई येथे अंजुमन-ए-इस्लाम करिमी लायब्ररीतर्फे आयोजित अखिल भारतीय दिनियात स्पर्धेत मौलाना आझाद महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

फारिहा नाझ मासिउद्दीन हिने इंग्रजी निबंध स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर पहिले, तर अब्दुल रब यांनी उर्दू शिक्षक निबंध स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावले. अब्दुल आहाद, अब्दुल अझीम यांनी उर्दू वक्तृत्वमध्ये उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावली. उर्दू निबंध स्पर्धेत शेख रेश्मा मुसा, शेख मोईद यांनी तर इंग्रजी निबंध स्पर्धेत शोएब अहमद याने विशेष कामगिरी केली. डॉ रफिउद्दीन नासेर, डॉ. मोहंमद आसेफ, पठाण फेरोज यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. संस्थेच्या अध्यक्ष पद्मश्री फातेमा झकेरिया, प्राचार्य डॉ.रझाउल्लाह खान, डॉ. एम. ए. बारी यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## डॉ. भापकर यांच्या शिक्षणविषयक पुस्तकांचे उद्या प्रकाशन

प्रतिनिधी । औरंगाबाद

विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर लिखित व संपादित शैक्षणिक षटकार - एक नवा संकल्प ,भाऊ-दीदी साथी नव्या युगाचे, माझा शालेय परिपाठ भाग १ व २, शासकीय योजनांचा खजिना ही पाच पुस्तके साकेत प्रकाशनातर्फे सोमवारी (२४ डिसेंबर) प्रकाशित होणार आहेत. महसूल प्रबोधिनीत सायंकाळी ६ वाजता ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे यांच्या उपस्थितीत, माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होईल. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन साकेत भांड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठांना डोळस ग्रुपतर्फे हस्तकलेचे प्रशिक्षण



**औरंगाबाद** | न्यू नाथनगरातील स्नेह सावली केअर सेंटरमध्ये डोळस महिला ग्रुपच्या वतीने हस्तकला कार्यशाळेत प्रशिक्षण देऊन ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले.

कार्यशाळेत मोत्यांची रांगोळी, पडद्याची लटकन, करंडा डेकोरेशन, पणती डेकोरेशन, आकाश दिवे, कागदाची फुले या वस्तू तयार करून दाखवल्या. राजश्री सराफ प्रशिक्षण दिले. कार्यक्रमात स्नेह सावली केअर सेंटरच्या डॉ. शिल्पा आसेगावकर, डॉ. बालाजी आसेगावकर, अक्षया पाटील, प्रतिभा खोडवे, डॉ. किरण मुंदडा, डॉ. अनुराधा अपसिंगेकर यांची उपस्थिती होती. यशस्वितेसाठी डोळस ग्रुपच्या शैलेजा मुन्शी, मिना तांबोळी, सुरेखा जोशी, निर्मला पाटील यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

## दिव्यांगांसाठी राज्याचे प्रलंबित धोरण जाहीर करा : सुप्रिया सुळे

**औरंगाबाद** | देशातील दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी अनेक वर्षांपासून धोरण तयार करून जाहीर केले आहे, मात्र राज्य शासनाकडून अद्याप दिशादर्शक धोरण जाहीर झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रलंबित धोरण जाहीर करण्याची मागणी केली आहे. २०१२ मध्ये राज्य शासनास अभ्यासगटाने तयार केलेला मसुदा सादर केला. दिव्यांग व्यक्ती कायदा २०१६ ला दृष्टिक्षेपात ठेवून राज्य शासनाच्या विविध विभागांनी ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी खर्च करावा, असे निर्देश आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अपंग हक्क विकास मंचने वेळोवेळी पाठपुरावा केलेला असून सकारात्मक उत्तर प्राप्त झालेली नाही. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करून मंत्रालय पातळीवर हा विभाग करण्याची मागणीही सुळे यांनी केली आहे.

# पोलिस निरीक्षक निर्मला परदेशी यांचा सत्कार



**औरंगाबाद** | एम.जी.एम. शैक्षणिक संकुलातील 'गंगा' वसतिगृहात डॉ. आकांक्षा देशमुख खून प्रकरणाच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पोलिस निरीक्षक निर्मला परदेशी यांचासह त्यांच्या पथकाचा सत्कार भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा तथा पंतप्रधान जनकल्याणकारी योजना प्रचार-प्रसार अभियानाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मनीषा भन्साळी यांनी केला.

महिला सुरक्षेचा जटिल प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असतानाच महिला पोलिसांच्या कर्तव्यप्रधान भूमिकेने अवघ्या सहा दिवसांतच आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळाले असल्याने परदेशी यांचे कौतूक केला. या प्रसंगी भाजपच्या लता सरदार यांच्यासह महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. झालेल्या चर्चेत निर्मला परदेशी यांनी महिला सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना लवकरच करण्यात येतील, असे आश्वासन दिले. या वेळी पोलिस उपनिरीक्षक पूनम पाटील, छोटूराम दुबे, नरसिंह पवार, संतोष मुदीराज, इरफान पठाण, राजेश बनकर, काकासाहेब तुपे आदींची उपस्थिती होती.

## निशा पाटीलची विदेश दौऱ्यासाठी निवड

**औरंगाबाद** | अजिंठा शिक्षण संस्था संचालित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयातील विद्यार्थिनी



निशा पाटील हिची द्विपक्षीय युवा एक्स्चेंज प्रोग्रामअंतर्गत भारतीय युवा प्रतिनिधी म्हणून निवड झाली आहे. युवकांमधील मूल्यांचे आणि संस्कृतीचे परस्पर समस्यांचे प्रबोधन करणे, भारत आणि बहरीन देशातील संस्कृती देवाणघेवाण तसेच युवकांच्या वैश्विक समस्यांचे परस्पर चर्चा करून निराकरण करणे, सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे आणि भारत आणि बहरीन यांच्यात चांगले संबंध विकसित करणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे, प्रकाश काळे, प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ.एस आर मंझा, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ.पंडित नलावडे, प्रा. ज्योती अधाने यांनी निशाचे अभिनंदन केले आहे.

**दिव्य मराठी विशेष** • 'आलबेल'मध्ये एसटी कामगारांचा मार्मिक संदेश

# कोणीच जन्मतः गुन्हेगार नसते; काळ, वेळ, परिस्थिती त्याला भाग पाडत असते

प्रतिनिधी | औरंगाबाद

माणूस जन्मताच गुन्हेगार बनत नाही, तर त्याला त्या वेळेची परिस्थिती गुन्हेगार बनवते. नाटकात एक बाप आपल्या अंध मुलीवरचा आरोप आपल्यावर घेतो, तर दुसरीकडे व्यभिचार करणाऱ्या पत्नीच्या देखाव्यातून पती तिचा खून करतो. तर गरीब परिस्थितीमुळे गुंड प्रवृत्तीकडे वळणारा भैरव. अशा तीन व्यक्तींवर आधारित आलबेल नाटकातून गुन्हेगार हा परिस्थितीने गुन्हेगार होतो, असे दाखवण्यात आले आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ विभागाच्या वतीने ललित कला भवनात आयोजित ६६ व्या कामगार नाट्य महोत्सवाच्या प्राथमिक फेरीत शुक्रवारी सई



परांजपे लिखित आलबेल या नाटकाचे कामगार कल्याण केंद्र मुकुंदवाडी यांचे सादरीकरण करण्यात आले. एका अंध मुलीवर समाजकल्याण अधिकारी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करत असताना त्या मुलीकडून त्याचा खून होतो. या खुनाचा आरोप तिचा बाप स्वतःवर घेतो, त्याला कारावास होतो. दुसऱ्या घटनेत सदा नावाचा पती आपल्या बायकोवर खूप प्रेम करतो, त्याच्या पाठीमागे त्याची पत्नी व्यभिचार करते. स्वतःच्या लग्न वाढदिवसाच्या दिवशी त्याने पाहिलेले दृश्य न पटणारे होते अन् त्याच क्षणी हातात असलेल्या समईने तिचा खून करतो. दुसरीकडे गरीब परिस्थितीमुळे चांगले जीवन जगण्यासाठी भैरव गुंड प्रवृत्तीचे काम करतो. तिघांना कारावास होतो. यात न्यायालय त्यांना सोडून देते. परंतु माणूस हा मुळातच गुन्हेगार नसतो, तर परिस्थिती गुन्हेगार बनवते हे या नाटकातून दाखवण्यात आले.

### यांचे लाभले सहकार्य

दिग्दर्शक कुंदन मलभागे यांनी केले. नाटकात बप्पा- राजू घाटे, भैरव- गजानन मुळे, सदा- मल्हारी वाघमारे, हवालदार -लालू वाघमारे, सगुणा- अलका कर्णिक, लीना- मीनाक्षी गवळी, व्यक्ती १- कुंदन मलभागे, व्यक्ती २- राजू सूर्यवंशी तसेच प्रकाश योजना चंद्रकांत चंदे, नेपथ्य- विकास सोनार, हनुमंत मदळे, संतोष होनमळे, वेशभूषा- आनंद चव्हाण, संगीत- संजय मोंदकुळे यांनी भूमिका साकारल्या.

**किड्स कॉर्नर**

### दिन विशेष

**ठळक घटना**

- १९२१ : 'विश्व भारती' विश्वविद्यालयाची स्थापना.
- १९४० : हिंदुस्तान एअरक्राफ्ट लिमिटेड हा भारतातील पहिला विमान निर्मितीचा कारखाना बंगलोर येथे सुरू.
- १९५४ : डॉ.जोसेफ ई. मरेने पहिले मानव मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वीरीत्या पार पाडले.
- २००० : कलकत्ता शहराचे नाव 'कोलकाता' झाले.

**जन्म**



- १८४५ : **रासबिहारी घोष,** प्रसिद्ध कायदेपंडित.
- १८५४ : **हेन्री बी. गुप्पी,** ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ.
- १९०२ : **चौधरी चरणसिंग,** ५ वे पंतप्रधान

**मृत्यू**



- १९९८ : **रत्नाप्पा कुंभार,** सहकारी चळवळीतील नेते.
- २००० : **नूरजहाँ,** अभिनेत्री व पार्श्वगायिका.
- २००४ : **पी. व्ही. नरसिंह राव,** भारताचे ९ वे पंतप्रधान.
- २०१० : **के. करुणाकरन,** केरळचे माजी मुख्यमंत्री.

## अंतराळात चालण्याचा अनुभव देणारे बूट

**नैसर्गिक चमत्कार**

मित्रांनो, अंतराळात अंतराळवीर कसे चालत असतील बरे? आपल्याला असे चालता आले तर? किती छान होईल ना....तर आता प्रत्यक्ष अंतराळात न जाता पृथ्वीवरच हा आनंद घेता येईल. तो कसा काय? तर मून शाइन नावाच्या कंपनीने असे बूट तयार केले आहेत. हे बूट घातले की अंतराळात चालल्याचा अनुभव घेता येणार आहे. अंतराळात किंवा चंद्रावर चालताना जो अनुभव येतो तसाच अनुभव हे बूट घालून चालले की येतो.

'मून वॉकर' नावाने हे बूट विक्रीसाठी आणले जात आहेत. या बुटांचे डिझाइन इंजिनिअर पॅट्रिक जरेजिरी यांनी तयार केले असून यात संपूर्ण पाऊल मॅग्नेटिक शक्तीने कव्हर केले जाते. यात शक्तिशाली चुंबकाचा व चुंबकीय नियमांचा वापर केला गेला आहे. चुंबकाचे दोन समान ध्रुव एकमेकांपासून दूर जातात, हे तत्त्व वापरून या बुटांचे सोल बनवले गेले आहेत. त्यामुळे चुंबकीय प्रभाव क्षेत्र तयार होते. त्यासाठी सर्वात शक्तिशाली अशा ४५ नियोडाइमियम या धातूपासून बनवलेल्या चुंबकांचा वापर केला गेला आहे. हा धातू स्वतःचे चुंबकीय क्षेत्र तयार करतो. बुटाच्या सोलमध्ये दोन्ही बाजूंना १२-१३ चुंबक बसवले गेले आहेत व त्यामुळे प्रतिकर्षण बळ तयार होते. बुटांच्या दोन थरांत ६ सेंमी अंतर असल्याने हे सोल गादीसारखे काम करतात व चालण्याचे संतुलन राखले जाते. नासा त्यांच्या अंतराळवीरांसाठी हीच सामग्री वापरून बूट तयार करते.



**बाल कविता**

**हत्ती**



एकदा गेलो झूमं
तिथे पाहिला हत्ती
पाहता क्षणी काय सांगू
मला आवडला किती !
भली मोठी सोंड त्याची
सुपाएवढे कान
इवली आखूड शेपटी
डोळे बारीक छान
जाडजूड पाय त्याचे
जणू चार खांब
पांढरेशुभ्र दोन सुळे
खायच्या दाताहून लांब
वजन पाच सहा टन
ऐटबाज शाकाहारी
दिसे मोठा अगडबंब
हत्ती असला भारी !

**-विनोद सिनकर,** औरंगाबाद.
मोबा :७५८८७ ३६३२६



**श्रीनाथ चांडक,** वर्ग ८ वा, वर्ग ७ वा, इटकूर, जि. उस्मानाबाद



**पृथ्वीराज जगताप,** महाराष्ट्र विद्यालय, बार्शी.

**अंकनगरी 48 चे उत्तर**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 8 | 4 | 16 | 12 |
| 4 | 12 | 16 | 2 | 8 | 6 |
| 6 | 4 | 2 | 8 | 12 | 16 |
| 8 | 16 | 12 | 6 | 2 | 4 |
| 12 | 8 | 6 | 16 | 4 | 2 |
| 16 | 2 | 4 | 12 | 6 | 8 |

प्रत्येक उभ्या रांगेतील,आडव्या रांगेतील व चौकटीतील अंकांची बेरीज 48 आहे

गणित सोपे वाटायला लावणारी ही खास कोडी देत आहोत.सुचना काळजीपूर्वक वाचा अन् करा सुरुवात.

MATHS-PUZZLE 6 सुरेखा काणे 0240-2328217

**अंकस्वस्तिक 48**

सुचना:-इथे या स्वस्तिकात दोन रंगीत चौकोनासहित सलग तीन चौकोनातील अंकांची बेरीज 48 आहे. यासाठी दिलेल्या चौकोटीतील अंक वापरावेत.




| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 18 | 19 | 19 | 20 | 20 | 22 |

**प्रतिक्रिया पाठवण्याचा पत्ता** | किड्स कॉर्नर, दैनिक दिव्य मराठी मोतीवाला कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. १५२९५, जालना रोड, औरंगाबाद- ४३१००३ | **ई-मेल** | dasu.bhagat@gmail.com